गडचिरोली दि. ०५/०७/२०१७

# *एनटिसिपी भरारी पथकाची रेस्टारंट आणि पानठेला चालकावर दंडात्मक कारवाई*

राष्ट्रीय तंबाखु नियत्रंण कार्यक्रम गडचिरोलीच्या माध्यमातून गडचिरोली जिल्हयाला तंबाखु मुक्त करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न केले जात आहेत.

कोटपा सन-२००३ कायद्या अंतर्गत गडचिरोली जिल्हयांत भरारी पथक कोटपा स्कॉट स्थापण करुन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केल्या जात आहे. बुधवार दिनांक ०५/०७/२०१७ रोजी भरारी पथकाने पानठेला आणि रेस्टारंट चालकांना कोटपा कायद्याचे उलंघन केल्या संबंधात तपासणी करुन त्याच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. आणि कायद्यानुसार दुकानात सुचना फलक लावण्याच्या सुचना देण्यात आल्या.

सदर कारवाई मा. जिल्हा पोलीस अधिक्षक साो. गडचिरोली यांच्या आदेशान्वये व पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोउपनिरीक्षक समु चौधरी, पोहवा/प्रमोद वाळके, पोना/उध्दव नरोटे, पोना/चवार, मपोशि/दुर्गा साखरे, चापोशि/चौरे यांनी योग्यरित्या कार्यवाही पार पाडली व पानठेला चालक व रेस्टारंट मालकांवर दंडात्मक कार्यवाही करुन २०००/- रु. (दोन हजार) दंड आकारण्यात आला.